RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १२, अंक ४७ ] बुधवार, जून २४, २०२६/आषाढ ३, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक ८३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### ठाणे महानगरपालिका, ठाणे

**शहर विकास विभाग**

**जाहीर सूचना**

**विषय :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील “मुंब्रा बायपास रस्त्याला जोडणारा इंदिरा गांधी रोड (देवरीपाडा)” या अस्तित्वातील रस्त्याचे १२.०० मी. इतके रुंदीकरणास मंजूरी मिळणेबाबत.

क्रमांक ठामपा/मुख्या.१/शविवि-२९/वियोअंक/४९१ .— ठाणे शहराची सुधारित विकास योजना सन १९९९ मध्ये मंजूर झाली असून, अंमलात आली आहे. तसेच सुधारित विकास योजनेतील वगळलेले क्षेत्राकरीता योजना (Excluded Portion) सन २००३ मध्ये मंजूर झाली असून, अंमलात आली आहे. सदर सुधारित विकास योजनेस सुमारे २० वर्षाचा कालावधी झालेला आहे.

“मौजे मुंब्रा येथील मुंब्रा बायपास रस्त्याला जोडणारा इंदिरा गांधी रोड (देवरीपाडा)” हा अस्तित्वातील रस्ता सरासरी ६.५ मी. ते ९.५ मी. रुंदीचा आहे. सदर परिसरातील दाट लोकवस्ती व अस्तित्वातील रस्त्यालगत शाळा आहे. सदर रस्त्यावरुन होणारी वाहतूक कोंडी तसेच शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून व भविष्यातील पुनर्विकास / विकसन लक्षात घेऊन अस्तित्वातील रस्त्याच्या मध्यरेषापासून दुतर्फा समांतर अंतर घेऊन १२ मी. रुंदीकरण प्रस्तावित आहे.

नियोजनाच्या दृष्टीने सदर अस्तित्वातील रस्त्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० नुसार १२.०० मी. रुंदीरेषा निश्चित करणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २१० नुसार रस्त्याची रुंदीरेषा विहित करण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्तांस आहेत.

ठाणे महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३८०, दि.१५/०५/२०२६ अन्वये सेक्टर क्र. १, मौजे मुंब्रा येथील मुंब्रा बायपास रस्त्याला जोडणारा इंदिरा गांधी रोड (देवरीपाडा) रस्त्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २१० अन्वये १२.०० मी. रुंदीरेषा विहित करण्याच्या प्रस्तावास मंजूरी प्राप्त आहे.

सदर मंजूरीच्या अनुषंगाने नागरिकांच्या सूचना सुचना/हरकती प्राप्त होणेकरिता जाहिर सूचना वृत्तपत्रात, कार्यालयीन सूचना फलकावर, प्रस्तावित रस्त्याच्या ठिकाणी तसेच *www.thanecity.gov.in* या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर मुंब्रा बायपास रस्त्याला जोडणारा इंदिरा गांधी रोड (देवरीपाडा) रस्त्याच्या नियोजित रस्ता रुंदीरेषेबाबत कोणत्याही व्यक्तीस सूचना / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना/हरकत महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे अथवा E-mail ID - *adtp@thanecity.gov.in* वर सादर करावी.

Web Site - *www.thanecity.gov.in*

**कुणाल अनिल मुळे,**
सहायक संचालक नगररचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक २२ जून २०२६.

## THANE MUNICIPAL CORPORATION, THANE
## TOWN PLANNING DEPARTMENT

### *Notice*

*Subject* :— Prescribing 12.00 mt. wide road line of existing Indira Gandhi Road (Devari Pada) connecting Mumbra bypass road Mumbra, Thane in Sector No. 9 from the center of the road on both sides parallelly, under Section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949.

No. TMC Hq.1/TDD-29/DIPC/491.— The Revised Development Plan of the City of Thane has been sanctioned and came into force in the year 1999 and the Development Plan for Excluded Portion (EP) of Revised Development Plan was sanctioned and came into force in year 2003. Since final sanction of Revised Development Plan, a period of more than 20 years have passed.

The existing Indira Gandhi Road (Devari Pada) connecting Mumbra bypass Road Mumbra, Thane in Sector No. 9 is having average width of 6.50 to 9.50 mt. There is densely populated area in this locality and a school located along the existing road. Considering the traffic congestion on this road, the safety of school children and future redevelopment / development, it is proposed to widen the existing road to 12 mt. in equal distance on both sides from the center of the existing road.

Hence it is necessary to prescribe existing Indira Gandhi Road (Devari Pada) connecting Mumbra bypass road width as 12.00 mt. wide under section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949. Hon. Municipal Commissioner has power to prescribe road line under Section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949.

Hon. General Body has accorded sanction to 12.00 mt. wide road line of existing Indira Gandhi Road (Devari Pada) connecting Mumbra bypass road in Sector No. 9, parallel from the centre of the road on both sides *vide* Resolution No. 380, dated 15.05.2026.

And therefore, this notice is being published in News papers, on the office Notice board, at the location of said road and also on official website mentioned below for inviting suggestions/ objections from the public. Any person may submit his suggestion/objection for the proposed road width within 30 (Thirty) days from the publication of this notice, to the Municipal Commissioner, Thane or on the E-mail ID-*adtp@thanecity.gov.in*

Web Site - *www.thanecity.gov.in*

KUNAL ANIL MULEY,
Assistant Director Town Planning,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane,
dated 22nd June 2026.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.